# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/01/2023 (शनिवार) दुपार

---

## चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील आरटीओ चेक पोस्ट कान्द्री येथे दिनांक २४/०१/२०२३ चे ००.३० वा. ते ०५.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— राकेश मुन्नीलाल तिवारी, वय ३८ वर्ष, रा. शास्त्री नगर कानपुर फ्लिट मॅनेजर हे लखनऊ वरून महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट कान्द्री येथे आल्यावर त्यांनी संपुर्ण डाकची तपासणी केल्या नंतर कोणीतरी अज्ञात आरोपीने सुविधा मुवर्स कंपनीचा कंटेनर क्र. युपी —७० केटी— ४२५६ हा डाक पार्सल घेवुन जात असतांना कंटेनरचा दरवाजा तोडुन कंटेनरचे आत ठेवलेले पिपर (काली मिर्च) च्या २५ बॅग एकुण किंमती अंदाजे असा एकुण २,६६,३७५/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. १९८८ नितेश पिपरोदे पोस्टे रामटेक मो. नं ९९२१७११९५५ हे करीत आहे.

## दुखापत

१) पो.स्टे. भिवापूर :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा भिवापुर येथे दिनांक २७/०१/२०२३ चे रात्री २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. कुंदा भारद पिपळकर, वय ४२ वर्ष, रा. भिवापुर ता. भिवापूर व आरोपी नामे— १) रामचंद्र श्रावण खेडकर २) हरीश रामचंद्र खेडकर रा. दोन्ही भिवापुर ता. भिवापूर यांचे घर एकमेकांच्या घराचे शेजारी राहत असुन फिर्यादी याचे पाळीव कुत्र्याला विनाकारण दगड मारल्याने तोडा तोंडी वाद झाला. आरोपी रामचंद्र खेडकर हा फिर्यादीचे मुलीची बदनामी करीत असल्याचे मुलाने सांगीतल्याने फिर्यादी समजविण्यासाठी मुलीसह गेली असता आरोपी व त्याचा मुलगा हरीश खेडकर यांनी फिर्यादी व तिच्या मुलीला शिवीगाळ करून लाकडी दांडयाने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ४४३ नागेश वाघाडे पो.स्टे. भिवापुर मो.नं. ८९७५५२२४४३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा बेला टाऊन येथे दिनांक २७/०१/२०२३ चे ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— महादेव श्रावनन आमनेरकर, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५ बेला ता. उमरेड जि. नागपुर हे शेतात ताराची कुंपण करीत असता यातील आरोपी नामे— हरिश महाजन हांगे रा. बेला याने फिर्यादीचे शेतात येवुन म्हणाला की ''तु इथे कुंपण करू नको तु तुझ्या पराटीला लागुन कुंपण कर'' असे बोलुन फिर्यादी सोबत शिविगाळ करून मारण्याची धमकी दिली व लाकडी काठीने मारल्याने उजव्या हाताचे अंगठयाला जखम झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदिप रूडे बं. नं. २०७ मो.नं. ९८२३१७७२०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**